एल.ए.सी क्र.१०३/२०२०
एस.डी.ओ वि. दुर्गाबाई

**आदेश नि.३१ वर**

१. गैरअर्जदार क्र.२ यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज आणि अर्जदाराने त्यावर दाखल केलेले म्हणणे यांचे अवलोकन केले.

२. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र.२ यांनी त्यांच्याविरूध्द दाव्याला जवाब नाही असा झालेला आदेश रद्द होवुन प्रकरणात त्यांना त्यांचा जवाब दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी यासाठी दाखल केला आहे.

४. अर्जदाराने सदर अर्जावर त्याचे म्हणणे दाखल केले. त्यामध्ये त्याने असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र.२ यांनी प्रकरण लांबणीवर पडावे या हेतुने मुदतीत त्यांचा लेखी जवाब दाखल केला नाही असे म्हणुन अर्जदाराने सदरचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

५. गैरअर्जदार क्र.२ यांनी प्रस्तुतच्या अर्जासोबत त्यांचा जवाब दाखल केला आहे. त्यावरून गैरअर्जदार क्र.२ यांना प्रकरणामध्ये विलंब करावयाचा आहे असे म्हणता येत नाही. याउलट गैरअर्जदार क्र.२ यांनी प्रस्तुतच्या अर्जासोबत अर्जाचा जवाब दाखल केला त्यावरून त्यांना सदर प्रकरण गुणदोषावर चालवायचे आहे हा त्यांचा सदहेतु असल्याचे दिसुन येते. वरील बाबीचा विचार करता गैरअर्जदार क्र.२ ने दाखल केलेला अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. त्याअन्वये अर्ज नि.३१ मंजुर करून गैरअर्जदार क्र.२ विरूध्द प्रकरण त्यांचे विना जवाब चालविण्याचा झालेला आदेश रद्द करून त्यांना प्रकरणामध्ये त्यांचा लेखी जवाब देण्याची परवानगी देण्यात येते.

स्वा
( पी.पी.देशपांडे )
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,वाशिम

दि.१६/०८/२०२१